**BEFORE THE HON'BLE NATIONAL GREEN TRIBUNAL**
**WESTERN ZONE BENCH, PUNE AT PUNE**
**ORIGINAL APPLICATION NO. 119/2022(WZ)**

In the

Matter Of: -

Sanjay Dhondev Joshi and Anr. ...Applicants

Versus

State of Maharashtra and Others ...Respondents

## INDEX

| Sr.No. | Particulars | Pg No. |
|---|---|---|
| 1. | Reply on behalf of the Respondent No. 9 along with affidavit. | |
| 2. | **ANNEXURE R-1:** The copy of the notices issued by the Respondent no. 9. | 162 - 182 |
| 3. | **ANNEXURE R-2:** The copy of the photos. | 183 - 185 |
| 4. | **ANNEXURE R-3:** The copy of the City Sanitation Action Plan issued by the Respondent no. 9. | 186 - 190 |

**BEFORE THE HON'BLE NATIONAL GREEN TRIBUNAL**

**WESTERN ZONE BENCH, PUNE AT PUNE**

**ORIGINAL APPLICATION NO. 119/2022(WZ)**

In the Matter Of: -

Sanjay Dhondev Joshi and Anr. ...Applicants

Versus

State of Maharashtra and Others ...Respondents

**REPLY ON BEHALF OF THE RESPONDENT NO. 9**

TO,

THE HON'BLE CHAIRPERSON

AND THE OTHER HON'BLE MEMBERS

OF THE NATIONAL GREEN TRIBUNAL

It is most respectfully submitted on behalf of Respondent No. 9 as under:

1. I Kishor Yashwant Dhumale Age :57 Occ : Administrative Officer to the behalf of Chief officer Kankavali Nagarpanchayt of the Respondent no 9 state on solemn affirmation that I have gone through the Application filed by the Applicants herein. I say that I have taken instructions from all the concerned departments and have gone through the documentations of the concerned department and I am in a position to reply the Original Application on the basis of the information received by me from my concerned departments.

SIGNED BEFORE ME

No Of Correction---

UMESH SURESH SAWANT

NOTARY KANKAVLI

Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY DIST.SINDHUDURG MAHARASHTRA GOVT. OF INDIA

NOTARY
SURESH SAWANT
SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

2. I say that all the contentions, allegations and statements made by the Applicants in the present Application are denied and nothing therein shall be deemed to be admitted by the Respondent No. 9, by reason of non-traverse or otherwise, unless specifically admitted herein.

3. I further say that the present Application has been filed by the Applicants under the provisions of Section 18(1) r/w Sections 14, 15, and 17 of the National Green Tribunal Act, 2010. The Applicants are contending that the Respondents no. 4 to 9 being the Municipal bodies have not taken any care to prevent water pollution and have also contended that any of the Municipal Councils do not have water treatment plants.

**PARA-WISE REPLY:**

4. I say that I need not comment as to the statement made by the Applicants in Paragraph A of the Application except that the Applicants have wrongly comes to a conclusion that the Respondent no 9 have not taken any care to prevent water pollution.

5. The contentions raised by the Applicants in the para no. B of the Application is that, the Applicant have received information on 07/12/2021 under RTI that the Respondents do not have any water treatment facilities and entire water is discharged to the rivers and or in sea. The Respondent No. 9 replies to this that since 2017 it has made mandatory to all the people residing in the limits of the

SIGNED BEFORE ME
No Of Correction---
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

Respondent no. 9 that each and every person has to follow the process of waste water treatment. The Respondent no. 9 says that every building constructed after 2018 has mandatorily installed the STP.

6. I say that in regards to the contentions raised by the Applicants in the para no. C of the Application that, the Respondent no. 1 to 3 have issued the direction to Respondent no 4 to 9 under section 33 of the Water (prevention and Control of Pollution) Act 1974. I say that in view of this the Respondent no. 9 replies that it has constructed a 5KID capacity FSTP in the year 2020 for septage management at the solid waste treatment plant of Respondent No. 9.

7. I say that the contents of Para D is a matter of record and hence I need not comment on the same.

8. With Respect to para E I say that Respondent no 9 has population about 16398. The Respondent No. 9 says that there is almost of 5 metric tons of solid waste is generated per day out of which 2 metric tons dry waste is segregated and 3 metric tons of wet waste is segregated, hence due care of the flora and fauna of Sindhudurg District is taken by the Respondent no 9.

9. I say that the contents of Para F are concerning the Respondent no 1 to 3 and hence I need not comment on the same. I reserve my right to file a detailed reply if required by this Hon'ble Court.

SIGNED BEFORE ME
No Of Correction---
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5634
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

10. With view of para G, I deny the contentions of the Applicant. The Applicants have not annexed any documents and I crave leave to file a detailed reply to the documents as and when the documents are produced by the Applicants.

11. With respect to para H, I deny the contentions of the Applicant that the Respondents have not taken due care in respect of water treatment and are not taking effective and immediate steps.

12. I state that, it is true that the Respondent no. 9 has prepared City Sanitation Action Plan and the Respondent no 9 have been submitted to the online portal of the government in order to obtain funds under Swachh Bharat Abhiyan 2 for the purpose of collecting all the sewage Kankavali city and building a sewerage network to process.

13. I say that, while granting a permission to carry construction of building's, apartments, houses etc. mandatorily the owner has to prepare a soak pit in the premises after treating the waste water generated in each apartment, after completion of the construction, the sewage treatment plant (STP) has been constructed and it is inspected and only after that the occupancy certificate is given. The Respondent No. 9 has issued various notices to the apartments where the Kankavali Municipal has found that the apartments have discharged the into sewers without treatment. The copy of the notices issued by the Respondent no. 9are enclosed herewith as **ANNEXURE R-1 "Colly"**. Installation of

SIGNED BEFORE ME
No Of Correction----
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
UMESH SURESH SAWANT
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

septic tank and soak pit has been made mandatory for every house.

14. The Respondent no. 9 states that it has constructed FSTP to process sewage in the city from 2020 and sewage from septic tank is being pumped by Vacuum Emptier vehicle and is being put in this FSTP for processing. The copy of the photos showing that the Respondent No. 9 with help of Vacuum Emptier vehicle empties the septic tanks puts the waste into FSTP for processing is enclosed herewith as **ANNEXURE R-2.**

15. The respondent no. 9 further submits that the contentions are not acceptable to the Respondent no. 9. KankavaliMunicipal Council is acting as per the guidelines given by the Government and as a part of this the Municipal Council has prepared City Sanitation Action Plan under Swachh Bharat Mission-2. The City Sanitation Action Plan includes connecting all the properties of the city through the sewerage network, collecting the sewage and processing it in the sewage treatment plant and reusing the treated sewage. This plan has a rough cost of Rs.100 crores and the government has given a mandate to an empaneled consultancy to prepare its detailed project report. The said action has been taken by the municipal council. The copy of the City Sanitation Action Plan issued by the Respondent no. 9 is enclosed herewith as **ANNEXURE R-3**.

16. Considering the said matter, we do not agree that the applicants are drawing the conclusion that the municipal council is indifferent towards the process of sewage and for that Respondent

SIGNED BEFORE ME
No Of Correction---
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5634
EXPIRY DATE
12/03/2026
GOVT. OF INDIA

number 1-2&3 should take action against the municipal council. The municipal council is a semi-governmental organization and since the municipal council has to depend on government funds for the development of infrastructure, this work has not yet been completed due to lack of funds.

17. I say that the contentions made by the Applicants in the Application are totally false and misinterpreted therefore the said Application may be disbelieved.

18. Further the Respondent no. 9 states that, it is trying to treat sewage and has submitted a proposal to the government. The respondent is well aware that the importance of the city in the Western Ghats and the said Respondent is sensitive about the Flora and Fauna, Biodiversity near this city and the Municipal Council is sensitive about taking various measures through the Municipal Council to make the city pollution free and for that an action plan has been prepared as above.

**REPLY TO LIMITATION**

19. The contentions raised by the Applicant in the limitation clause shows that the Applicant has preferred the Application within the limb u however the Applicants in memorandum of Application have mention that the Application is under section 18(1) r/w Sections 14, 15, and 17 of National Green Tribunal act 2010. Here if the Application is treated as under section 14 then the

SIGNED BEFORE ME
No Of Correction---
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

Application is beyond the limitation as is lible to be dismissed with cost on the part of the Applicants.

"Section 14(3) of the Act states that"-

"Section 14. Tribunal to settle disputes.

(3) No application for adjudication of dispute under this section shall be entertained by the Tribunal unless it is made within a period of six months from the date on which the cause of action for such dispute first arose:

Provided that the Tribunal may, if it is satisfied that the applicant was prevented by sufficient cause from filing the application within the said period, allow it to be filed within a further period not exceeding sixty days.

**REPLY TO JURISDICTION**

20. Application invoking the jurisdiction of this Hon'ble Tribunal u/s 14 of the NGT Act, 2010 is not maintainable and therefore the present Application filed by the Appellant ought to be dismissed.

21. In the view of the facts and circumstances stated and contentions raised hereinabove, it is submitted that the prayers sought by the Applicant seeking the legal actions against the Respondent Nos. 9 are not maintainable and therefore the present Application filed by the Applicants ought to be dismissed.

DATE: 28/03/2023

PLACE: KANKAVALI

SIGNED BEFORE ME
No Of Correction----
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
GOVT. OF INDIA

ADV FOR RESPONDENT No. 9

**V E R I F I C A T I O N**

I, Kishor Yashwant Dhumale Age :57 Occ : Administrative Officer to the behalf of Chief officer Kankavali Nagarpanchayt of the Respondent no 9 herein do hereby solemnly declared that what is stated in the paragraph Nos. 5 to 19 is true to the best of my knowledge which is based on the documents made available to me and that what is stated in remaining paragraphs nos. 1 to 4 and 20 to 22 are based on the information and belief which I believe the same to be true.

Solemnly declared at Kankavali. )

Dated this 27th day of March, 2023 )

Before me

Identified by me,

कणकवली नगरपंचायत कणकवली

Kishor Yashwant Dhumale

Administrative Officer of Respondent no 9

N.R.S.NO. 600 / 02 /2023
Total No of Correction Nil
Document is of ten Pages
SIGNED & EXECUTED BEFORE ME

28/03/2023
Date / /201
Kankavli

NOTARY
Umesh S.Sawant 28/03
Kankavli

NOTARY
UMESH SURESH SAWANT
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

Advocates for the Respondent no 9

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA

किशोर यशवंत धुमाळे
Kishor Yashawant Dhumale

जन्म वर्ष / Year of Birth : 1966
पुरुष / Male

आधार – सामान्य माणसाचा अधिकार

SIGNED BEFORE ME
No Of Correction----
UMESH SURESH SAWANT
NOTARY KANKAVLI
Dist Sindhudurg .(M S.)India

NOTARY
UMESH SURESH SAWANT
DIST.SINDHUDURG
MAHARASHTRA
REGD.NO.5524
EXPIRY DATE
12/03/2028
GOVT. OF INDIA

AADHAAR
भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण
UNIQUE IDENTIFICATION AUTHORITY OF INDIA

Aadhaar - Samanya Maansacha Adhikaar

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

### बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रति, श्री विलास बाळकृष्ण कोरगावंकर , श्री. विलास शिवराम पेडणेकर व सौ. वृषाली विलास पेडणेकर
कणकवली,कणकवली

विषय:- बांधकाम परवाना (प्राथमिक) मंजुरी ( अधिकृत ) मंजुरी देणेवाबत.

संदर्भ:- अर्ज क्र. – 22617042800003 अर्ज दि. – 28/04/2017

महाशय,

आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक 28/04/2017 रोजी केलेल्या अर्जास अनुसरून या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना BPA\00011\2017-18 देणेत येत आहे.

बांधकाम तपशील : निवासी वापरासाठी तळ मजला बिल्डींग B(44.56 चौ.मि.) व पहिला मजला बिल्डींग B(524.21 चौ.मि.); वाणिज्य वापरासाठी तळ मजला बिल्डींग B(495.26 चौ.मि.).

बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.नं. | :- १३०५ ते १३०८ व ४३६६ ,४३६ | त.सा.क्र. / स.नं. (सर्व्हे नं.) | :- २०४ अ १४, २०४ ब १२ व |
| | | प्लॉट क्र. | :- |
| गट क्र. / ख.क्र./ भूखंड क्र./ विभाग | :- नगर रचना | शहर | :- कणकवली |
| रस्ता/प्रभाग क्र./ मोहल्ला | :- | हिस्सा क्र./ घर क्र. | :- सर्व्हे नंबर २०५ब ३ |
| प्लॉटचे क्षेत्रफळ | :- 2535 | | |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- 1064.03 | | |

खास शर्ती / अटीवर

1. नगररचना सिंधुदूर्ग यांचे कार्यालयाकडुन पत्र क्र. जा.क्र.वा.प / कणकवलीन.प /सि.स.नं - / नरसिं / दि. .
2. विनशेती वापरासाठी मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेण्याची आहे. विनशेती परवानगी मिळाल्यानंतरच बांधकामास सुरुवात करावयाची आहे.
3. नियोजीत इमारत स्टील्ट+तळमजला+पहिलामजला+दुसरामजला+तिसरामजला + चौथा मजला या विषयांकित जागेतील नियोजीत इमारतीचा वापर रहिवास या कारणासाठी व बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे असणे आवश्यक आहे.
4. स्थलदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची समासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर किमान असली पाहिजे, त्यावर कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करु नये तसे अतिक्रमण हे कायदेशिर कारवाईस पात्र राहील .
5. नियोजित बांधकामाचे, भुखंडातील व अस्तित्वातील बाधंकामे धरुन एकुण क्षेत्र हे भुखंडाच्या निव्वळ क्षेत्रापेक्षा ¾ जास्त असता कामा नये. इमारतीच्या नकाशावर दर्शवलेले भुखंड क्षेत्र बांधकाम क्षेत्र गणनातक्ते व आकडेमोड अचुक असल्याबावतची खात्री सल्लागार वास्तुशिल्पकार / अभियंता यांनी करावयाची आहे,याबावत काही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी जवाबदारी त्यांची व विकासकाची राहील.
6. विषयांकित जागेची तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख/ नगरभुमापन कार्यालय यांचेकडुन मोजणी करुण घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक आहे.
7. इमारतीचे छप्पर अगर इतर आच्छादने इमारतीच्या भींतीपासुन 75 से.मी अगर इमारतीपासुन भुंखडाची हद्द यामध्ये जे कमी अंतर असेल त्यापेक्षा अधिक पुढे घेता कामा नये.
8. नियोजीत बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बद्दल करावयाचे असल्यास पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. इमारतीचे बांधकाम हे मंजुर नकाशाप्रमाणेच केले पाहीजे. त्या व्यतरिक्त कोणतेही काम केल्यास ते बेकायदेशिरहोईल व कायदेशीर होईल व कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

O/c Received
28/4/2017

2

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

9. बांधकाम करावयाच्या भुखंडाच्या हद्दीबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची इजमेंट राईट बाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.
10. इमारतीचे बांधकाम चालु असताना कामास वापरावयाच्या कोणत्याही प्रकारचा माल जिल्हा परिषदेच्या अगर कोणत्याही रस्त्यावर अगर गटारत ठेवता कामा नये.
11. नियोजीत बांधकामाखालील भुखंडामध्ये कमीत कमी 10 झाडे लावुन ती जगवली पाहीजेत.
12. इमारतीचे जाते (प्लींथ) हे मंजुर नकाशाप्रमाणे असले पाहीजेत. इमारतीचे बांधकाम हे जातेचे पातळी (प्लींथ लेवल) पर्यत आलेवर प्लींथ चेकींगसाठी या कार्यालयाकडे अर्ज करुन रितसर प्लींथ चेकींगची परवानगी घेऊन पुढील बांधकाम करावे. अन्यथा सदरचे बांधकाम बंद करण्यात येईल.
13. नियमानुसार विकास शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही प्रकाराचा विकास करु नये.
14. इमारतीचे आर.सी. सी डिझाईन अर्हताधरक स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत तयार करुन बांधकाम भुंकपरोधक होण्याच्या दृष्टीने भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या मालकातील तरतुदीनुसार व नॅशनल बिल्डींग कोडमधील तरतुदीनुसार इकडे सादर करावयाचे आहेत. त्यांनतर प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम सुरु करावयाचे आहे.
15. बांधकामाचा वापर महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम सन 1965 चे कलम 193 व म.प्रा. नगररचना अधिनियमाचे कलम 45 प्रमाणे इकडील परवानगीनचे केला जाईल.
16. इमारतीचे "Structural design, Part VT, Structural design of national building , code of India 1970 " नुसार स्ट्रक्चरल इंजिनियरमार्फत करुन घेऊन त्यानुसार इमारतीचे काम करावयाचे आहे. तसेच आय. एस 1893-1975 मधील तरतुदीनुसार भुंकपवलाचे गणग करुन त्यानुसार इमारतीचे डिझाईन करावयाचे आहे.
17. आर. सी.सी कामासाठी एम -20 दर्जाचे सिमेंट कॉंक्रीट वापरणे आवश्यक आहे. इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईन या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. तदनंतर इमारतीच्या बांधकामास सुरवात करावयाची आहे.
18. स्टिल्ट किमान तीन बाजुंनी खुले असले पाहिजेल. स्टिल्टचा वापर वाहनतळ (पार्किंग) यासाठीचा करावयाचा असुन स्टिल्टची उंची 2.20 मे. पेक्षा जास्त असता कामा नये.
19. जागेच्या सेटबॅक अंतरामध्ये बाधित होत असलेली जागा विनामोबदला रस्ता / पाणंद रुंदिकरणासाठी नगरपालिककडे हस्तांतरीत करावयाची आहे. व सदरची जागा अस्तित्वातील पांणदीच्या समपातळीत तयार करुन घ्यावयाची आहे.
20. विकसीत करवायाच्या जागेची नैसर्गिक पातळी (लेव्हल) मध्ये कोणताही बद्दल (कमी अथवा उंच) करताना या कार्यालयाची पुर्ण परवानगी घ्यावयाची आहे. सदर अटींचा भंग केल्यास आपली बांधकाम परवानगी रद्द करणेत येईल अथवा या कार्यालयाकडुन सुचविली जाणारी अन्य उपाय योजना अथवा पर्यायी व्यवस्था आपण स्वखर्चाने करावयाची आहे. याकामी होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार रहाल.
21. कोणत्याही परिस्थीती मध्ये आवश्यकतेनुसार विकसनाची परवानगी रद्द करण्याबावतचे सर्व अधिकार कणकवली नगरपंचातीकडे रोखुन ठेवले आहेत.
22. भुंखडाअंतर्गत असणाऱ्या झाडाची तोड करणेची असल्यास प्राधिकरणाची पुर्ण परवानगी घेणे आवश्यक आहे.
23. मा. नगररचानाकार, सिंधुदुर्ग यानी हिरव्या रंगाने केलेल्या सुधारणेस व अभिप्राय पत्रातील शर्ती व अटींना अधिन राहुन ही परवानगी देण्यास येत आहे.
24. सदर इमारतीच्या हद्दीमध्ये विदयुत शक्तीचा तुटवडा कमी करवण्याच्या दृष्टीकोनातुन सौर उर्जेद्वारे पाणी तापविण्याच्या पद्धतीचा वापर करावयाचा आहे.
25. सदर इमारतीच्या हद्दीमध्ये पर्जन्यजल पुर्णभरणासाठी व्यवस्था करावी
26. प्रस्तावीत बांधकामामुळे वहीवाटेचे मार्ग विस्तार विजवाहक तारा नदी नाले पावसाळी पाण्याचे प्रवाह इ. बाधा येत नसल्याची खात्री करुन व योग्य ती सामासिक अंतरे सुटत असलेची खात्री करुन बांधकामास सुरवात करावी.
27. विषयाकित जागेतिल बांधकाम करताना IS Code- 13920-1893 भुंकप रोधक आर.सी. सी. डीझाईननुसार बांधकाम घटकाचे डिजाईन अर्हता प्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडुन करुन घेणे आवश्यक असुन , त्याच्या देखरेखेखाली व नियोजीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.
28. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर 30 दिवसांचे आंत अर्हताधरक वास्तशास्त्रज्ञ / अभियंता / सर्वक्षक यांच्या मार्फत बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रासह (Completion certificate ) इमारत पुर्ण झाल्याचे या कार्यालयास कळविले पाहिजे. व या कार्यालयाकडुन वापर प्रमाणपत्र (Occupancy certificate) घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय इमारतीचा वापर करता येणार नाही. तसे निर्देशनास आल्यास महाराष्ट्रा नगरपालीक ,नगरपंचायत व औध्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 193(3) (ब) अन्वेय अर्जदार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
29. नियोजीत इमारतीच्या कामाच्या जागी खाली नमुद केलेल्या तपशिलाचा नामफलक (Display Board) कामास सुरुवात करण्यापुर्वी

**कणकवली नगरपंचायत , कणकवली**

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

लावणे आवश्यक आहे. a)मालक विकासक, वास्तुविशारद व ठेकेदार यांची नांवे व पुर्ण पत्ते , b)जागेचा स.न. / सि.स.न / वार्ड क्र. , c)सेदर्भाधीन जागेचा नियोजन प्राधिकरणाकडिल इमारत बांधकाम परवानगीचा जा.क्र. व दिनांक ,d)मंजुर अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ,e)निवासी वाणिज्य गाळयांचे एकुण क्रमांक व त्याचे क्षेत्र ,f)सविस्तर मंजुर नकाशाच्या प्रती पहाण्याची जेथे उपलब्ध असतील तो पत्ता ,g) वाणिज्य आणि निवासी प्रकल्प असेल तर जास्त खपाच्या दोन वर्तमानपत्रांमध्ये वरील अ.क्र. 21 मध्ये नमुद केल्यानुसार जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

30. इमारतीचे आर.सी. सी डिझाईन अर्हताधरक स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत तयार करुन बांधकाम भुंकपरोधक होण्याच्या दृष्टीने भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या मालकातील तरतुदींनुसार व नॅशनल बिल्डींग कोडमधील तरतुदीनुसार इकडे सादर करावयाचे आहेत. त्यांनतर प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम सुरु करावयाचे आहे.

31. सदर बांधकामाच्या कामकाजाकरिता बाल कामगारांची नियुक्तीय करणेत येवू नये तसे आढळून आल्या०ास पुढील होणा-या कारवाईस आपण सर्वस्वी० जवाबदार रहाल याची दक्षता घ्या वी.

32. जागेच्या मालकी हक्काबाबत तसेच हद्द व बांधकाम सर्व संबंधितांची संमत्ती सादर न केल्यास त्यावर काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील. तसेच भूखंडाच्या जमिनीची व लगतच्या जमिनीमधुन दर्शविलेल्या पोच मार्गाखालील जमिनीच्या मालकी हक्कावाबत वादउद भवल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी अर्जदार यांची राहील.

33. नियोजित बांधकाम करावयाच्या भूखंड यांचा पोचमार्ग वर्गीकृत रस्त्यास सन्मुख असलेस, आवश्यक असल्यास संवधित महामर्ग प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

34. नियोजित रस्त्याने भागश: बाधित होणारे क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखताद्वारे नाममात्र एक रुपायाच्या मोबदल्यात 15 दिवसांच्या आत नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

35. नियोजित रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधीत क्षेत्र नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

36. भूखंडाच्या जमिनीची तसेच लगतच्या जमिनीमधुन दर्शविलेला पोच मार्गाखालील जाणारे क्षेत्राची नोंद मिळकत कागदोपत्री "इतर हक्क" यामध्ये विकासक यांनी करुन घेणेची आहे. त्याशिवाय वापर प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

37. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यावस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापुर्वी तुम्ही तुमच्या मालकीच्या भुखंडात केली पाहीजे.तसेच ती जवळपासच्या विहीरीपासुन किमान १८.००मीटर अंतरावर असणे आवश्यक आहे.

38. सांडपाणी तुम्ही तुमच्या आवारात बंद खड्ड्यामध्ये (बंद सोकपीट) मध्ये मुरविले पाहीजे.

39. बांधकाम करतेवेळी सांडपाणी व पावसाचे पाणी वाहुन जाण्याकरीता नैसर्गिक मार्ग खुले राहतील याची दक्षता घ्यावी. असे नैसर्गिक मार्ग नियोजित बांधकामामुळे बंध झाले असतील तर सदरचे पाणी वाहुन नेण्यासाठी योग्य ती तरतुद करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

40. पिण्याच्या पाण्यासाठी विहीर अथवा बोअरवेल या कार्यालयाची परवानगी घेऊनच खोदावयाची व बांधावयाची आहे

41. मंजुर नकाशात दर्शविल्याप्रमाणे संडास टाकीसाठी बांधकाम करावयाचे असुन संडास टाकीमधील आऊटलेटचे पाणी झिरपण्यासाठी मंजुर नकाशात दर्शविल्याप्रमाणे लांबी-रुंदी व उंचीच्या सोकपीट बांधावयाच्या आहेत. तथापि, नगरपंचायतीने सुचना केल्यास मंजुर ड्रेनेज प्लाननुसार संडास टाकी व सोकपीटचे बांधकाम करावयाचे आहे. तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ई.टि.पी.प्लेंट बसविणे विकासक यांचेवर बंधनकारक राहील.अन्यथा वापर प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

42. संडासची टाकी (सेप्टीक टॅक) बांधकाम केवळ आर.सी.सी. डिझाईनचे करावयाचे आहे. अन्य कोणत्याही प्रकारचे करु नये.

43. ड्रेनेजसाठी डबल पाईपलाईन सिस्टिम वापरावयाची याप्रमाणे ड्रेनेज सिस्टिम वापरावयाची असुन सेवरेजसाठी(Sewerage) वेगळी पाईपलाईन व सुलेज (Sulege) साठी, बाथरुम सिंक , बेसिन वैगरेच्या सांडपाण्यासाठी वेगळी ड्रेनेज लाईन ठेवावयाची आहे.

44. ड्रेनेज सिस्टिम प्लॅन सादर केल्याशिवाय वापर प्रमाणपत्र (Occupancy certificate) दिले जाणार नाही.

45. सदरहू भुखंडामध्ये Underground Water Storage Tank आवश्यक त्या साईजची बांधावयाची आहे.

46. नागरी क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रीया करुन त्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर करण्याकरीता एकूण सांडपाण्याच्या किमान २० टक्के सांडपाणी पुर्नवापरासाठी उपलब्ध करण्यात यावे.असे मानक केंद्र शासनाने विहीत केले आहे. व राज्य शासनाने स्विकारले आहे. त्याकरीता सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी मिनी फिल्टरेशन प्लांट बसविणे आवश्यकच आहे.

47. सांडपाणी निचरा व व्यवस्थापनासाठी (E.T.P.) फिल्टरेशन प्लांट किंवा बायोडायजेस्टर टोयलेट सिस्टीम किवा DWAT सिस्टीम बसविणे विकासक यांजवर बंधनकारक राहील,व या सिस्टीमचा वापर करून सदर यंत्रणा कार्यान्वित झालेचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे

48. सदर इमारतीच्या ड्रेनेज व्यवस्थेवाबत भविष्यात कोणतीही समस्या अथवा हरकत उद्भवल्यास ती योग्य प्रकारे दुर करण्याची जबाबदारी विकासक व भोगवटाधारक यांची राहील.

49. सदर संकुल परिसरात योग्य त्या ठिकाणी संकुलातील सदनिकांच्या प्रमाणात ओल्या व सुकया कच- कचरा कुंड्या ठेवणे विकासक यांजवर बंधनकारक राहील.

3.

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

50. सदर संकुलातील वाहनतळाची जागा (Parking) कायमस्वरूपी मोकळी ठेवणे आपणांवर बंधनकारक राहील.सदर वाहनतळ जागेचा वापर सदनिकाधारकांसाठी राहणार आहे. तसेच सदर जागेची कोणासही विक्री करता येणार नाही व कोणताही अन्य वापर अनुज्ञेय राहणार नाही.
51. शासनाने विहित केलेल्या नियमानुसार प्रत्येक बांधकामावर प्रतिभूती शुल्क (security Deposite) नगरपंचायतकडून आकारण्यात येईल ,सदरचे शुल्क परतावा स्वरूपाचे असून नियोजित इमारत बांधकाम विहित निकषानुसार पूर्ण केल्यानंतर व या कार्यालयाकडून भोगवटाप्रमाणपत्र दिल्यानंतर विकासक यांस अदा करण्यात येईल.
52. अपंग व्यक्तीच्या इमारतीतील सहज सुलभ प्रवेश व मुक्तसंचाराच्या दृष्टीने रम्प रेलिंगजच्या आवश्यकता सोयी सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.
53. राष्ट्रीय इमारत संहिता २००५ मधील खंड क्र.४ मधील तरतुदीनुसार योग्य ती आगप्रतिबंधक योजना करणे बंधनकारक राहील.
54. जर सदर प्रकरणात अर्जदाराने दिलेली कोणत्याही प्रकारची माहीती व कागदपत्रे खोटी अथवा चुकीची अथवा दिशाभुल करणारी आहे असे आढळुन आल्यास हा परवानगी आदेश आपोआप रद्द समजणेत येईल.
55. ही परवानगी ती दिल्याची तारखेपासुन एक वर्षापर्यंत वैध्य राहील. त्या तारखेनंतर ती रद्द समजणेत येईल. रद्द होण्यापुर्वी मुदतवाढीकरीता अर्ज केल्यास त्यांचा मुदतवाढ देणेकामी विचार करणेत येईल.
56. अंतिम मुदतवाढीनंतर कोणतीही मुदतवाढ देणेत येणार नाही.
57. उक्त मिळकतीचा बिनशेतीमोजणी नकाशा जोते प्रमाणपत्र पडताळणीवेळी कार्यालयात लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा या कार्यालयाकडून इमारत जोते प्रमाणपत्र निर्गमित केले जाणार नाही याची विकासकांनी नोंद घ्यावी.
58. नियोजित बांधकाम जर वेगवेगळ्या भूखंडामध्ये प्रस्तावित केले असल्यास केवळ जोते प्रमाणपत्र पडताळणीवेळी पूर्वी सदर भूखंडाचे एकत्रीकरण करून त्याचा अधिकृत मोजणी नकाशा व मालकी हक्क दस्ताऐवज तयार करून या कार्यालयाकडे सादर करण्याच्या अटीस अधीन राहून उक्त बांधकाम परवानगी निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर बाबींची पूर्तता विकासक यांजकडून न झाल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.
59. सदर बांधकाम परवानगी बाबत अथवा मालकी हक्क वा इतर कोणत्याही बाबतीत वाद , हरकत उद्भवल्यास उक्त परवानगी तत्काळ रद्द समजण्यात येईल.
60. हिरव्या रंगाने सुधारणा केल्याप्रमाणे बांधकाम नकाशा मंजूर करणेत येत आहे.
61. बांधकाम नकाशावर दर्शविल्याप्रमाणेच निवासी व वाणिज्य बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे.
62. कणकवली शहर मंजूर विकास आराखड्यातील मी रस्ता नियोजनाने बाधित होणा-या क्षेत्राचा ७/१२ दसरी नोंद करून नगरपंचायतच्या नावे करून देणेची जबाबदारी विकासक यांची राहील.अन्यथा भोगवटाप्रमाणपत्र देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
63. शासनाच्या अस्तित्वात असलेले तसेच भविष्यात वेळोवेळी अमंलात येणाऱ्या बांधकाम परवानगी,चटई क्षेत्र, TDR, अग्निशमन व सुरक्षा , सांडपाणी व्यवस्था व कामगार कल्याण उपकर तसेच अन्य बांधकामाशी सबंधित सर्व बाबीं शासन निर्णय, परिपत्रक, आदेश,सूचना इत्यादीची अंमलबजावणी सबंधित विकासक यांनी करणे बंधनकारक राहील.
64. वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग केल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

65. 65.विकसित करण्यात येणाऱ्या मिळकतीमध्ये अस्तित्वात असणारे नैसर्गिक- पावसाळी पाण्याचे प्रवाह , अस्तित्वातील सांडपाणी व्यवस्थेकरीता असलेली गटर ,यामध्ये कोणत्याही स्वरूपाचा अडथळा निर्माण होवू नये याची खबरदारी आपण घ्यावयाची आहे. तसेच याबाबत पर्यायीव्यवस्था करणे गरजेचे असल्यास या कार्यालयाच्या निदर्शनास आपणांवर बंधनकारक राहतील.
66. मंजूर नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे बेसमेंट क्षेत्र हे चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त असल्याने बेसमेंटचा वापर हा केवळ वाहनतळ (Parking) व स्टोर रूम साठवण खोली (Store Room) म्हणूनच करणे बंधनकारक आहे.
जीर्ण झालेल्या इमारती निर्लेखित करून प्रत्यक्ष कामास सुरवात करणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत सदर इमारतीचा वापर होत असल्यास त्यामधील रहिवाशी व सबंधित साहित्य याची आवश्यक ती तरतूद करणे आपणांवर बंधनकारक आहे

येणेप्रमाणे परवाना दिला असे , आ.क्र.कनपं/बां.वि/२०५/2017 दि:- 28-04-2017 [signature] 28.4.17

बांधकाम परवाना क्रमांक द. नं. :- BPA\00011\2017-18

दिनांक :- 28/04/2017

4.

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५)

## बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रति, श्री गुरुनाथ गजानन डिचोल्कर, श्री. राजकुमार गजानन डिचोलकर व श्री.दर्शन गजानन डिचोलकर
कणकवली,कणकवली

विषय:- बांधकाम परवाना (प्राथमिक) मंजुरी ( अधिकृत ) मंजुरी देणेबाबत.
संदर्भ: - 1.अर्ज क्र. – 22618020900007 अर्ज दि. -- 09/02/2018
2. नगर अभियंता यांचा दिनांक ____________रोजीचा अभिप्राय.

महाशय,

आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यामाठी बांधकाम परवानो मिळण्यामाठी दिनांक 09/02/2018 रोजी केलेल्या अर्जास अनुसरून या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नगार /बांधकाम परवाना BPA\00024\2017-18 देणेत येत आहे.

बांधकाम तपशील : निवासी वापरासाठी तळ मजला(31.77 चौ.मि.), दुसरा मजला(69.13 चौ.मि.) व पहिला मजला(63.98 चौ.मि.), वाणिज्य वापरासाठी तळ मजला(32.21 चौ.मि.).

### बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.नं. | :- ३४५६ व ३४५७ | त.सा.क्र. / स.नं. (सर्व्हे नं.) | :- सिसन३४५८ |
| गट क्र. / ख.क्र./ भूखंड क्र./ विभाग | :- नगर रचना | प्लॉट क्र. | :- |
| रस्ता/प्रभाग क्र./ मोहल्ला | :- | शहर | :- कणकवली |
| | | हिस्सा क्र./ घर क्र. | :- |
| प्लॉटचे क्षेत्रफळ | :- 137.7 चौ.मि. | | |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- 197.09 चौ.मि. | | |

खास शर्ती / अटीवर

1. नगररचना सिंधुदूर्ग यांचे कार्यालयाकडुन पत्र क्र. जा.क्र.वा.प / कणकवलीन.प /सि.स.नं - / नरसिं / दि.
2. बिनशेती वापरासाठी मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेण्याची आहे. बिनशेती परवानगी मिळाल्यानंतरच बांधकामास सुरुवात करावयाची आहे.
3. नियोजीत इमारत स्टील्ट+तळमजला+पहिलामजला+दुसरामजला+तिसरामजला + चौथा मजला या विषयांकित जागेतील नियोजीत इमारतीचा वापर रहिवास या कारणासाठी व बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे असणे आवश्यक आहे.
4. स्थलदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची समासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर किमान असली पाहिजे, त्यावर कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करु नये तसे अतिक्रमण हे कायदेशिर कारवाईस पात्र राहील .
5. नियोजित बांधकामाचे, भुखंडातील व अस्तित्वातील बाधंकामे धरुन एकुण क्षेत्र हे भुखंडाच्या निव्वळ क्षेत्रापेक्षा ¾ जास्त असता कामा नये. इमारतीच्या नकाशावर दर्शवलेले भुखंड क्षेत्र वांधकाम क्षेत्र गणनातक्ते व आकडेमोड अचुक असल्याबाबतची खात्री सल्लागार वास्तुशिल्पकार / अभियंता यांनी करावयाची आहे,याबाबत काही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी त्यांची व विकासकाची राहील.
6. विषयांकित जागेची तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख/ नगरभुमापन कार्यालय यांचेकडुन मोजणी करुण घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक आहे.
7. इमारतीचे छप्पर अगर इतर आच्छादने इमारतीच्या भींतीपासुन 75 से.मी अगर इमारतीपासुन भुंखडाची हद्द यामध्ये जे कमी अंतर असेल त्यापेक्षा अधिक पुढे घेता कामा नये.
8. नियोजीत बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बद्दल करावयाचे असल्यास पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. इमारतीचे बांधकाम हे मंजुर नकाशाप्रमाणेच केले पाहीजे. त्या व्यतरिक्त कोणतेही काम केल्यास ते बेकायदेशिरहोईल व कायदेशीर होईल व कायदेशीर कारवाईस

O/C
9/02/2018

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

पात्र राहील.

9. बांधकाम करावयाच्या भुखंडाच्या हद्दीबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची इजमेंट राईट बाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

10. इमारतीचे बांधकाम चालु असताना कामास वापरावयाच्या कोणत्याही प्रकारचा माल जिल्हा परिषदेच्या अगर कोणत्याही रस्त्यावर अगर गटारत ठेवता कामा नये.

11. नियोजीत बांधकामाखालील भुखंडामध्ये कमीत कमी 10 झाडे लावुन ती जगवली पाहीजेत.

12. इमारतीचे जाते (प्लींथ) हे मंजुर नकाशाप्रमाणे असले पाहीजेत. इमारतीचे बांधकाम हे जातेचे पातळी (प्लींथ लेवल) पर्यत आलेवर प्लींथ चेकींगसाठी या कार्यालयाकडे अर्ज करुन रितसर प्लींथ चेकींगची परवानगी घेऊन पुढील बांधकाम करावे. अन्यथा सदरचे बांधकाम बंद करण्यात येईल.

13. नियमानुसार विकास शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही प्रकाराचा विकास करु नये.

14. इमारतीचे आर.सी. सी डिझाईन अर्हताधरक स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत तयार करुन बांधकाम भुंकपरोधक होण्याच्या दृष्टीने भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या मालकातील तरतुदीनुसार व नॅशनल बिल्डींग कोडमधील तरतुदीनुसार इकडे सादर करावयाचे आहेत. त्यांनतर प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम सुरु करावयाचे आहे.

15. बांधकामाचा वापर महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम सन 1965 चे कलम 193 व म.प्रा. नगररचना अधिनियमाचे कलम 45 प्रमाणे इकडील परवानगीनचे केला जाईल.

16. इमारतीचे "Structural design, Part VT, Structural design of national building , code of India 1970 " नुसार स्ट्रक्चरल इंजिनियरमार्फत करुन घेऊन त्यानुसार इमारतीचे काम करावयाचे आहे. तसेच आय. एस 1893-1975 मधील तरतुदीनुसार भुंकपबलाचे गणन करुन त्यानुसार इमारतीचे डिझाईन करावयाचे आहे.

17. आर. सी.सी कामासाठी एम -20 दर्जाचे सिमेंट कौंक्रीट वापरणे आवश्यक आहे. इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईन या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. तदनंतर इमारतीच्या बांधकामास सुरवात करावयाची आहे.

18. स्टिल्ट किमान तीन बाजुंनी खुले असले पाहिजेत. स्टिल्टचा वापर वाहनतळ (पार्किंग) यासाठीचा करावयाचा असुन स्टिल्टची उंची 2.20 मे. पेक्षा जास्त असता कामा नये.

19. जागेच्या सेटबॅक अंतरामध्ये बाधित होत असलेली जागा विनामोबदला रस्ता / पाणंद रुंदिकरणासाठी नगरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाची आहे. व सदरची जागा अस्तित्वातील पांणदीच्या समपातळीत तयार करुन घ्यावयाची आहे.

20. विकसीत करवायाच्या जागेची नैसर्गिक पातळी (लेव्हल) मध्ये कोणताही बद्दल (कमी अथवा उंच) करताना या कार्यालयाची पुर्ण परवानगी घ्यावयाची आहे. सदर अटींचा भंग केल्यास आपली बांधकाम परवानगी रद्द करणेत येईल अथवा या कार्यालयाकडुन सुचविले जाणारी अन्य उपाय योजना अथवा पर्यायी व्यवस्था आपण स्वखर्चाने करावयाची आहे. याकामी होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार रहाल.

21. कोणत्याही परिस्थीती मध्ये आवश्यकतेनुसार विकसनाची परवानगी रद्द करन्याबाबतचे सर्व अधिकार कणकवली नगरपंचातीकडे राखुन ठेवले आहेत.

22. भुंखडाअंतर्गत असणाऱ्या झाडाची तोड करणेची असल्यास प्राधिकरणाची पुर्ण परवानगी घेणे आवश्यक आहे.

23. मा. नगररचानाकार, सिंधुदुर्ग यानी हिरव्या रंगाने केलेल्या सुधारणेस व अभिप्राय पत्रातील शर्ती व अटींना अधिन राहुन ही परवानगी देण्यास येत आहे.

24. सदर इमारतीच्या हद्दीमध्ये विदयुत शक्तीचा तुटवडा कमी करवण्याच्या दृष्टीकोनातुन सौर उर्जेद्वारे पाणी तापविण्याच्या पद्धतीचा वापर करावयाचा आहे.

25. सदर इमारतीच्या हद्दीमध्ये पर्जन्यजल पुर्णभरणासाठी व्यवस्था करावी

26. प्रस्तावीत बांधकामामुळे वहीवाटेचे मार्ग विस्तार विजवाहक तारा नदी नाले पावसाळी पाण्याचे प्रवाह इ. बाधा येत नसल्याची खात्री करुन व योग्य ती सामासिक अंतरे सुटत असलेची खात्री करुन बांधकामास सुरवात करावी.

27. विषयाकित जागेतिल बांधकाम करताना IS Code- 13920-1893 भुंकप रोधक आर.सी. सी. डीझाईननुसार बांधकाम घटकाचे डिजाईन अर्हता प्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडुन करुन घेणे आवश्यक असुन , त्याच्या देखरेखेखाली व नियोजीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करणे अर्जदार / विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

28. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर 30 दिवसांचे आंत अर्हताधरक वास्तशास्त्रज्ञ / अभिंयता / सर्वेक्षक यांच्या मार्फत बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्रासह (Completion certificate ) इमारत पुर्ण झाल्याचे या कार्यालयास कळविले पाहिजे. व या कार्यालयाकडुन वापर प्रमाणपत्र (Occupancy certificate) घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय इमारतीचा वापर करता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास महाराष्ट्रा नगरपालीक ,नगरपंचायत व औध्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 193(3) (ब) अन्वेय अर्जदार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

## कणकवली नगरपंचायत , कणकवली

नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४व ४५ )

29. नियोजीत इमारतीच्या कामाच्या जागी खाली नमुद केलेल्या तपशिलाचा नामफलक (Display Board) कामास सुरुवात करण्यापूर्वी लावणे आवश्यक आहे. a)मालक विकासक, वास्तुविशारद व ठेकेदार यांची नावे व पुर्ण पत्ते . b)जागेचा स.नं. / न.भु.क्र. / न.ना.न / वार्ड व , c)संदर्भाधीन जागेचा नियोजन प्राधिकरणाकडिल इमारत बांधकाम परवानगीचा जा.क्र. व दिनांक .d)मंजूर अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र ,e)निवासी वाणिज्य गाळ्यांचे एकुण क्रमांक व त्याचे क्षेत्र ,f)सविस्तर मंजूर नकाशाच्या प्रती पहाण्याची जेथे उपलब्ध असतील तो पत्ता ,g) वाणिज्य आणि निवासी प्रकल्प असेल तर जास्त खपाच्या दोन वर्तमानपत्रांमध्ये वरील अ.क्र. 21 मध्ये नमुद केल्यानुसार जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

30. इमारतीचे आर.सी. सी डिझाईन अर्हताधारक स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत तयार करुन बांधकाम भुकंपरोधक होण्याच्या दृष्टीने भारतीय मानक संस्थेने विहीत केलेल्या मालकातील तरतुदीनुसार व नॅशनल बिल्डींग कोडमधील तरतुदीनुसार इकडे सादर करावयाचे आहेत. त्यांनतर प्रत्यक्ष इमारतीचे बांधकाम सुरु करावयाचे आहे.

31. सदर बांधकामाच्या कामकाजाकरिता बाल कामगारांची नियुक्तीय करणेत येवू नये तसे आढळून आल्यास पुढील होणा-या कारवाईस आपण सर्वस्वी जबाबदार रहाल याची दक्षता घ्या वी.

32. जागेच्या मालकी हक्काबाबत तसेच हद्द व बांधकाम सर्व संबधितांची संमत्ती सादर न केल्यास त्यावर काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील. तसेच भूखंडाच्या जमिनीची व लगतच्या जमिनीमधुन दर्शविलेल्या पोच मार्गाखालील जमिनीच्या मालकी हक्काबाबत वादउद भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

33. नियोजित बांधकाम करावयाच्या भूखंड यांचा पोचमार्ग वर्गीकृत रस्त्यास सन्मुख असलेस, आवश्यक असल्यास संबधित महामार्ग प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

34. नियोजित रस्त्याने भागश: बाधित होणारे क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखताद्वारे नाममात्र एक रुपायाच्या मोबदल्यात 15 दिवसाच्या आत नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

35. नियोजित रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधीत क्षेत्र नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

36. भूखंडाच्या जमिनीची तसेच लगतच्या जमिनीमधुन दर्शविलेला पोच मार्गाखालील जाणारे क्षेत्राची नोंद मिळकत कागदोपत्री "इतर हक्क यामध्ये विकासक यांनी करुन घेणेची आहे. त्याशिवाय वापर प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

37. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यावस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापुर्वी तुम्ही तुमच्या मालकीच्या भुखंडात केली पाहीजे.तसेच ती जवळपासच्या विहीरीपासुन किमान १८.०० मीटर अंतरावर असणे आवश्यक आहे.

38. सांडपाणी तुम्ही तुमच्या आवारात बंद खड्ड्यामध्ये (बंद सोकपीट) मध्ये मुरविले पाहीजे.

बांधकाम करतेवेळी सांडपाणी व पावसाचे पाणी वाहुन जाण्याकरीता नैसर्गिक मार्ग खुले राहतील याची दक्षता घ्यावी. असे नैसर्गिक

39. मार्ग नियोजित बांधकामामुळे बंध झाले असतील तर सदरचे पाणी वाहुन नेण्यासाठी योग्य ती तरतुद करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

पिण्याच्या पाण्यासाठी विहीर अथवा बोअरवेल या कार्यालयाची परवानगी घेऊनच खोदावयाची व बांधावयाची आहे

40. मंजुर नकाशात दर्शविल्याप्रमाणे संडास टाकीसाठी बांधकाम करावयाचे असुन संडास टाकीमधील आऊटलेटचे पाणी झिरपण्यासाठी

41. *मंजुर नकाशात दर्शविल्याप्रमाणे लांबी-रुंदी व उंचीच्या सोकपीट बांधावयाच्या आहेत. तथापि, नगरपंचायतीने सुचना केल्यास मंजुर

मंजुर नकाशात दर्शविल्याप्रमाणे लांबी-रुंदी व उंचीच्या सोकपीट बांधावयाच्या आहेत. तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ई.टि.पी.प्लॅंट ड्रेनेज प्लाननुसार संडास टाकी व सोकपीटचे बांधकाम करावयाचे आहे. तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ई.टि.पी.प्लॅंट

ड्रेनेज प्लाननुसार संडास टाकी व सोकपीटचे बांधकाम करावयाचे आहे. अन्यथा वापर प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

बसविणे विकासक यांचेवर बंधनकारक राहील.अन्यथा वापर प्रमाणपत्र दिले जाणार नाही. डिझाईनचे करावयाचे आहे. अन्य कोणत्याही प्रकारचे करु नये.

